F/c


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३ , महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६१७९६९ , फॅक्स - २२६९०००७
E-mail : desk१८@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


ईमेल/ स्पीड पोस्ट

क्रमांक : १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१८-१९/६७
दिनांक : ०४/०२/२०१९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजने अंतर्गत ऑनलाईन लिंक बंद झाल्यानंतर त्रुटींची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्याबाबतचा संस्थेचा प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ : या संचालनालयाचे पत्र क्र. तंशिसं/ईबीसी/वि.का. पत्र/२०१८/२४७, दि. २८/०६/२०१८

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, सन २०१७-१८ करीता डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजने करीता सर्व विभागीय कार्यालयांचे अखत्यारितील संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमास केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियव्दारे प्रवेशित विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरून घेण्यात आले होते. त्या अनुषंगाने संचालनालयाचे संदर्भिय पत्रान्वये विभागीय कार्यालयांना अर्जांची छाननी (Scrutiny) करुन अर्ज मंजूर/ नामंजूर करण्यात्करीता अंतिम मुदत ३०/०६/२०१८ देण्यात आली होती. विभागीय कार्यालयांनी सदर मुदती पर्यंत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जापैकी त्रुटी आढळून आलेले अर्ज अमान्य करून ऊर्वरीत पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीस मंजूरी देण्यात आली आहे.

तथापि, उपरोक्त मुदतीनंतर संस्थांनी अर्जांमधील त्रुटींची पूर्तता करून पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मान्यतेसाठी आपल्याकडे पाठविले असल्यास किंवा संस्थास्तरावर अशा प्रकारचे प्रलंबित असलेले अर्ज त्रूटींची पूर्तता करून संस्थांकडून मागवून घेवून सदर अर्ज आपल्या स्तरावर छाननी करून पात्र विद्यार्थ्यांच्या यादीसह शिष्यवृत्तीच्या मंजूर करावयाच्या रकमेची माहिती या संचालनालयास दि. ०७/०२/२०१९ पर्यंत (ई-मेलव्दारे ) पाठवावी. तसेच अशा प्रकारचे विद्यार्थ्यांचे अर्ज/ प्रस्ताव आपल्या स्तरावर प्रलंबित नसल्यास त्याबाबतही ई-मेलव्दारे तात्काळ कळवावे. हि विनंती.

(व्ही. जी. तांबे)
सहा.संचालक (तां.)
तंत्रशिक्षण संचालयनालय म. रा. मुंबई



पृष्ठांकन क्र.- विकाम/शिक्षण/२०१९/403
सहसंचालक, तंत्र शिक्षण वि.का. अमरावती
दि. 0 6 FEB 2019

१) प्राचार्य सर्व शासन- अनुदानित, विना अनुदानीत अभ्यासक्रमांच्या संस्था अमरावती यांना उपरोक्त दिलेल्या प्रपत्रानुसार आवश्यक कार्यवाहीकरीता
२) प्रोग्रामर, तंत्र शिक्षण वि.का. अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, अमरावती.